

# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य

---





१०/०८/२०१५

**मी घेईन श्रद्धानंदांची जागा !**

आप्पा तेव्हा दहा वर्षांचा होता. अवचित् अस्मानातून काळीज दुभंग करणारी एक वार्ता आली –

‘स्वामी श्रद्धानंद यांचा गोळ्या घालून अमानुष खून !

खुन्याचे नाव अब्दुल रशीद !’

स्वामी श्रद्धानंद उंचापुरा, उमद्या मनाचा, थोर चारित्र्याचा संन्यासी !

आप्पांच्या काळजात खोल कळ उमटली. संतापही उफाळून आला. तो शमल्यावर एक प्रश्न मनात घुमू लागला –

‘होय. श्रद्धानंद गेले हे खरं.

पण पुढे काय?

कोण त्यांची जागा येईल?

कोण त्यांचं काम पुढे चालवील?’

दहा वर्षांच्या कोवळ्या वयात एक दृढ निर्धार झाला.

‘मी घेईन त्यांची जागा.

त्यांचं अपुरं राहिलेलं काम मी पुरं करीन !’

ही प्रतिज्ञा उत्स्फूर्त होती. शुद्धांत:करणानं, उत्कटतेनं घेतलेली होती, वयाच्या सदुसष्टाव्या वर्षी आणि मृत्यू निकट असतानाही विनायक विश्वनाथ पेंडसे यांना त्या प्रतिज्ञेचं कधी विस्मरण झालं नाही! या प्रतिज्ञेमधून पुढच्या अनेक प्रतिज्ञा जन्म पावल्या.

आप्पाच्या मनात चाललेले संकल्प असे असत की, एक दिवस मीसुद्धा सावरकर, भगतसिंह, सुखदेव, राजगुरू यांच्यासारखा क्रांतिकारक होईन आणि ब्रिटीश सत्तेविरुद्ध युद्ध पुकारीन. हत्या आणि बंड नव्हे, तर मोठं युद्ध! त्या युद्धात ब्रिटिश सैन्य हरेल आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेल!

वयाच्या चौदाव्या वर्षी या मुलानं स्वत:च्याच मनाशी गंभीरपणे शपथ घेतली की'माझं आयुष्य मी माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी वाहात आहे!' बालपणीच्या त्या स्वप्निल दिवसांनासुद्धा समर्पणाची अशी धग होती, यात कुणाला आश्चर्य वाटू नये.

आप्पांची स्वारी नेहमी भाऊसाहेब देशमुखांकडे रमलेली असायची. भाऊसाहेब कधी कधी कलिंगड कापायचे, अन् हाक द्यायचे, 'या रे, कलिंगड कापतोय!' मग एकीकडे कलिंगडाचा आस्वाद घेत भाऊसाहेब देशस्थितीविषयी बोलत. टिळक पथक ज्या बालचर सेनेचं होतं, ती बालचर सेना लाला लजपतराय यांनी स्थापलेली होती. या बालचर सेनेनं आणि त्यातही टिळक पथकानं शिवाजीमहाराजांसारखा पराक्रम केला पाहिजे असं भाऊसाहेब सांगत. सायंकाळी ते स्वत: जातीनं पथकाचे कार्यक्रम घेत. मुलांना ग्रंथालयात मुक्त बसू देत. या ग्रंथालयातच आप्पानं शिवचरित्राची पारायणं केली. अनेक उत्तमोत्तम चरित्रं वाचली. वाचलेलं सगळं समजावून घेत, त्यावर विचार करत दिवसच्या दिवस भारल्यासारखे निघून जात.